वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे ॲड. श्री.पी.एम. राठी वकिलांमार्फत शपथेवर पुन्हा सुरू.

२. आता मला दिनांक ०७.०१.२०२१९ रोजीच्या एकूण दोन नोटीस दाखविण्यात आल्या. सदरच्या नोटीस मला प्राप्त झाल्या होत्या. त्यास अनुक्रमे निशाणी क्र.५६ व ५७ देण्यात येते. तसेच, त्याबाबतच्या अस्सल पोहोच पावत्या मला दाखविण्यात आल्या, त्यावर वनिता सुरेश कलंत्री यांच्या सह्या आहेत. त्यास अनुक्रमे निशाणी क्र.५८ व ५९ देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २५.०९.२०१९ रोजी प्रतिवादीने मला नोटीस पाठविली होती व ती मला प्राप्त झाली होती. आता मला त्याबाबतची पोहोच पावती दाखविण्यात आली, त्यावरील सही माझी नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या पोहोच पावतीवरील पत्ता हा माझाच आहे. दिनांक २५.०९.२०१९ रोजीच्या नोटीसला आर्टिकल–अ देण्यात येते व सदरच्या पोहोच पावतीस निशाणी क्र.६० देण्यात येते.

३. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादींना दिनांक १०.१०.२०१८ रोजी अर्ज दिला होता. आता मला सदरचा अर्ज दाखविण्यात आला, त्यावरील सही माझी आहे. त्यास निशाणी क्र.६१ देण्यात येते. आता मला दिनांक १८.१०.२०१६ रोजीची गोदाम पावतीची अस्सल प्रत दाखविण्यात आली, त्यावर माझी सही आहे. त्यास निशाणी

क्र.६२ देण्यात येते. साक्षिदार स्वत:हून सांगतो की, निशाणी क्र.६२ वर काहीही न लिहिता मी सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, कर्ज मागणी अर्जावर व वचनचिठ्ठी वर माझी सही आहे. त्यास अनुक्रमे निशाणी क्र.६३ व ६४ देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, अटी व शर्तीच्या संमती पत्रावर माझी सही आहे. त्यास निशाणी क्र.६५ देण्यात येते.

४. आता मला दिनांक १७.१०.२०१६ रोजीची गोदाम पावतीची अस्सल प्रत, कर्ज मागणी अर्ज, वचनचिठ्ठी व संमतीपत्र दाखविण्यात आले, त्यावरील सह्या माझ्या आहेत. त्यास अनुक्रमे निशाणी क्र.६६ ते ६९ देण्यात येते. हे मला माहिती नाही की, दिनांक १८.०१.२०१९ रोजी प्रतिवादीने वर्तमानपत्रामध्ये जाहीर नोटीस दिली होती किंवा कसे.

५. हे म्हणणे खरे आहे की, धान्याच्या व्यवसाया व्यतिरिक्त मी पत्रकारीता करतो. हे म्हणणे खरे आहे की, मी पत्रकार असल्यामुळे माझे शक्यतोवर वर्तमानपत्राचे वाचन होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या कर्जाची मुदत संपल्यानंतर प्रतिवादीने मला नोटीस व वर्तमानपत्रात जाहीर नोटीस देवून पूर्ण प्रक्रिया पार पाडून माझ्या धान्य मालाचा लिलाव केला. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीने माझ्याविरूध्द धनादेश अनादरीत झाल्याबाबत फौजदारी प्रकरण क्र.३३८/२०१९ जळगाव जामोद येथील न्यायालयात दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या प्रकरणात मला न्यायालयाने शिक्षा व

दंड ठोठावला होता. हे म्हणणे खरे नाही की, धनादेशाच्या प्रकरणात माझा बचाव व्हावा या हेतुने मी प्रस्तुतचे प्रकरण दाखल केले.

६. हे म्हणणे खरे नाही की, उडीद हे कडधान्य नाशवंत स्वरूपाचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, उडीद हे गोदामात जास्त काळासाठी ठेवल्यास त्याची प्रत व वजन थोड्या प्रमाणात कमी होते. हे म्हणणे खरे नाही की, कर्जाची रक्कम टाळण्याकरीता व धनादेश अनादरीत प्रकरणामध्ये माझा बचाव होण्याकरीता मी प्रस्तुतचे खोटे प्रकरण दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास काही नाही.

समक्ष

Sd/-

(व्ही. व्ही. जोशी)

न्यायाधीश

सहकार न्यायालय, अकोला.

दिनांक: ०२.०३.२०२६

ठिकाण: अकोला